

“नमो मङ्गले मातृदेवते सुवर्णभूमे ते ।
स्वतन्त्रतायै नमो नमस्ते भारतीय जनते ॥”

स्वतंत्र भारतमातेच्या चरणी सादर समर्पण

## – ऋणनिर्देश–

कोणत्याही कार्यपूर्तीसाठी परमेश्वराचे आणि वडील मंडळींचे आशीर्वाद पाठीशी असावे लागतात. त्याचबरोबरच अनेकांच्या सहकार्यामुळेच कार्यपूर्तीचा आनंद आपल्याला मिळत असतो आणि म्हणूनच कार्य संपन्न झाल्यानंतर मदत करणा–यांचा ऋणनिर्देश करणे उचित ठरते.

प्रथमतः मला बुध्दी आणि प्रेरणा देणा–या परमेश्वराला, गुरूजनांना आणि वडिलमंडळींना वंदन !

लघुशोधनिबंधाचा विषय सुचविण्यापासून ते तो लिहून पूर्ण होईपर्यंत वेळोवेळी मला जे बहुमोल मार्गदर्शन आदरणीय डॉ. सुहासिनी राजेभोसले यांनी केले त्याबद्दल मी त्यांची हार्दिक आभारी आहे. तसेच डॉ. आ. ह. साळुंखे, श्री. बी. एस. खराडे, यांचेही अमोल मार्गदर्शन मिळाले. डॉ. सौ. शोभना जाधव यांची स्वातंत्र्य युध्दाचा इतिहास जाणून घेण्यास मला खूपच मदत झाली. शुध्द–लेखनाच्या बाबतीत आमचे विभाग प्रमुख प्रा. के. जे. कुंभार, यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले. श्री. एस. डी. आढाव आणि डॉ. एस. व्ही. निकम, यांनीही पुष्कळ मदत केली. या सर्व प्राध्यापकांचे मी मनःपूर्वक आभार मानते.

भांडारकर प्राच्य विद्या संशोधन मंडळ, पुणे येथील ग्रंथालयातील ग्रंथपाल डॉ. श्री. वा. ल. मंजुळ यांनी या लघुशोधनिबंधासाठी उपयुक्त पुस्तकांची माहिती देऊन ती पुस्तके उपलब्ध करुन दिली. त्याबद्दल मी त्यांची आणि तेथील सेवकवर्गाची अत्यंत आभारी आहे. धर्मकोश, वाई येथील सौ. नानजकर, कला वाणिज्य महाविद्यालय, सातारा येथील ग्रंथपाल श्री. एल. ए. पाटील आणि शिवाजी महाविद्यालय, सातारा येथील ग्रंथपाल व सेवक वर्ग या सर्वांची मी अत्यंत आभारी आहे.

मी ज्या रयत शिक्षण संस्थेच्या "शिवाजी महाविद्यालयात काम करते. तेथील आमचे आदरणीय प्राचार्य मा. श्री. आर. डी. गायकवाड यांनी दिलेले प्रोत्साहन आणि वेळोवेळी केलेली मदत याबद्दल मी त्यांची ऋणी आहे. तसेच उपप्राचार्य श्री. दाते यांनी केलेल्या मदतीबद्दल मी त्यांचेही आभार मानते. लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, सातारा येथील प्राचार्य श्री. अमरसिंह राणे यांच्या प्रेरणेने संस्कृतचे एम्. फिल चे केंद्र सुरु झाल्याने मला हे काम करणे सोईचे झाले. त्यामुळे त्यांचेही मनःपूर्वक आभार.

सौ.अंजली सायगांवकर, यांचेकडून अल्पावधीत टंकलेखनाचे काम चांगल्या प्रकारे करून मिळाल्याबद्दल मी त्यांची आभारी आहे. स्क्रिन प्रिंटींगचे काम अगदी कमी वेळात परंतु उत्तम करून दिल्याबद्दल श्री.महेश गावडे यांची तर बाइंडिंगचे काम करून दिल्याबद्दल मसूर येथील विजय मुद्रणालयाचे मालक श्री.सुधीर पाणदरे यांची मी आभारी आहे. झेरॉक्सचे मालक श्री.खुटाळे यांना धन्यवाद ।

आई-वडील,सासु-सासरे,पती यांनी दिलेले प्रोत्साहन,आशीर्वाद वेळोवेळी केलेले सहकार्य याबद्दल त्यांचे केवळ आभार मानून मोकळे होणे उचित ठरणार नाही या सर्वांनी तसेच मुलांनी केलेल्या सहकार्याबद्दल सदैव कृतज्ञ राहणेच योग्य ठरेल. माझे पती श्री.वि.वा.अराणके, यांनी प्रत्येक ठिकाणी जाताना माझ्याबरोबर केलेली धावपळ,सहजीवनात दिलेले सहकार्य यामुळेच मी हे काम करू शकले. यातील निम्मे श्रेय त्यांनाच आहे.

एम.फिल च्या परीक्षेच्या वेळी माझी मानलेली नणंद सौ.प्रमिला वसगडेकर, यांनी त्यांच्या घरी माझी राहण्याची सोय केली. श्री.व सौ.वसगडेकरांची मी ऋणी आहे. याशिवाय ज्यांनी ज्यांनी या कामी मला मदत केली प्रोत्साहन दिले त्या सर्वांचे, सहका-यांचे मी आभार मानते.

सातारा

दिनांक : २५ नोव्हेंबर, 1992 — प्रा. सौ. उर्मिला अराणके